# ख्रिस्तावर प्रेम करणाऱ्या सर्वांचे एकमेकांबरोबर जिव्हाळ्याचे नाते प्रस्थापित करण्यासाठी चार प्रस्ताव

'नवीन ऐक्याच्या दिशेने' हे पत्र आपल्या सर्वांसाठी सन २०१५ मधील आपल्या वाटचालीसाठी, आधारभूत मार्गदर्शक असे आहे. येत्या वर्षामध्ये आपण सर्वांनी 'ख्रिस्तावर प्रेम करणाऱ्या' सर्व लोकांमध्ये जिव्हाळ्याचे नाते प्रस्थापित करण्यासाठी कटिबद्ध व्हावे असे ह्या पत्राद्वारे सुचविण्यात आले आहे. त्यासाठी पुढील चार प्रस्ताव:

ख्रिस्ताने आपल्या मैत्रीचा हात सर्वांसाठी पुढे केला. त्याने कोणालाही वगळले नाही. या पृथ्वीतलावरील ख्रिस्तावर प्रेम करणारे सर्व लोक म्हणजे मित्रत्वाचा मोठा समुदाय आहे. हेच जिव्हाळ्याचे, प्रेमाचे नाते. याच कारणासाठी जगात ठिकठिकाणी मानवतेवर आघात, जखमा होत आहेत. त्या बऱ्या करण्यासाठी प्रयत्नशील असावे, आपली मते इतरांवर न लादता जागतिक जिव्हाळा, प्रेम निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे. या जागतिक जिव्हाळ्याच्या नात्यांमधून कोणतीही व्यक्ती किंवा समाज वगळला जाऊ नये.

प्रत्येक व्यक्ती या कार्यामध्ये कशाप्रकारे भाग घेऊ शकते?

**पहिला प्रस्ताव : स्थानिक प्रार्थनासंघामध्ये सहभाग.**

''तुम्ही एकमेकांवर प्रीती करा. यावरून सर्व लोक ओळखतील की तुम्ही माझे शिष्य आहात'' (योहान १३:३४-३५).

काही विशिष्ट प्रसंगी, विशेषकरून आंतरराष्ट्रीय प्रार्थनासभा होतात. त्याप्रसंगी जिव्हाळ्याचं, ऐक्याचं नातं दिसून येतं. परंतु असे प्रसंग फारच विरळ असतात. ते नेहमीच होत नाहीत. जगात सर्वत्र या मोठ्या समुदायाचा लहान भाग असतो. तो गरीबही असतो. श्रद्धा ही एकट्या-दुकट्याने जोपासता येत नाही. जेथे जिव्हाळ्याचा, ऐक्याचा अनुभव येतो, जेथे निर्बंध मुक्त ऐक्याचा उगम 'ख्रिस्त' असतो, तेथेच खरीखुरी श्रद्धा फुलत असते.

स्थानिक मंडळ्या (किंवा धर्मग्राम), समूह किंवा प्रार्थनासंघ ही मित्रत्वाची प्रतिके असू शकतात. प्रेमभावाने एकमेकांना साहाय्य करणाऱ्या, दुर्बलांना साहाय्य करणाऱ्या, परकीय आणि मतभिन्नता असलेल्यांनाही प्रेमाने वागविणाऱ्या. . .

**सर्वांसाठी सूचना** : रविवारच्या उपासनेमध्ये सहभागी झाल्याने इतर कार्यामध्ये विशेषत: ज्यांना आपण निवडले नाही अशा लोकांबरोबर कार्य करताना आपल्याला जिव्हाळ्याचा, ऐक्याचा अनुभव येतो का?

**स्थानिक पाळकीय नेत्यांसाठी सूचना** : युवक काय म्हणतात त्याकडे लक्ष द्या. त्यांच्या चांगल्या सूचना समजून घ्या. आपल्या मंडळीसाठी, समुहासाठी त्यांच्या सूचनांचा उपयोग करा. इतर ज्येष्ठ लोकांनी युवकांच्या सूचनांचा सकारात्मक विचार करावा म्हणून त्यांना तयार करा.

**दुसरा प्रस्ताव : मैत्रीचे जग मोठे करण्यासाठी सीमोल्लंघन करा. ''ज्याअर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूपैकी एकाला केले, त्याअर्थी ते मला केले आहे'' ( मत्तय २५:४० ).**

येशूने सर्वांना प्रेम दिले. विशेषत: गरीब, लहान मुले, समाजातील दुर्लक्षित लोक. आपण ख्रिस्ताला अनुसरत असतील तर गरजू उपेक्षितांची सेवा करण्यासाठी आपल्याला सीमा ओलांडाव्या लागतील. ख्रिस्ती धर्मातील अन्य पंथिय तसेच ख्रिस्तेतर लोकांबरोबर आपल्याला ऐक्यभावना जोपासण्यासाठी कार्य करावे लागेल.

दारिद्र्य भौतिक किंवा आध्यात्मिक असू शकते. ऐक्यामुळे दुहेरी कार्य होते. इतरांना खूप काही देता येते. आपण बऱ्याच वेळा 'घेणारे' असतो.

**सर्वांसाठी सूचना** : साधारण एक वर्षभरासाठी आपण आपल्या शेजारच्या गावाची निवड करून त्यांना मैत्रीचा हात पुढे करा. त्यांच्याशी ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करा. आजारी, उपेक्षित, गरीब, अपंग, अनाथ बालके, स्थलांतरित, बेरोजगार अशा लोकांकडे लक्ष द्या. त्यांना साहाय्य करा.

**स्थानिक पाळकीय नेत्यांसाठी सूचना** : जिथे ऐक्याची गरज आहे आणि जिथे शक्यता आहे अशा जागा शोधण्यासाठी युवकांना मार्गदर्शन करा.

**तिसरा प्रस्ताव : इतर लोकांबरोबर विचारांची देवाण-घेवाण करा. आठवड्यात एकदा किंवा महिन्यात एकदा एकत्र येण्याचा प्रयत्न करा. एकत्रितपणे बायबल वाचन करा, प्रार्थना करा, गायन करा, मननचिंतन करा.**

**स्थानिक पाळकीय नेत्यांसाठी सूचना** : प्रार्थनेसाठी, वैचारिक देवाण-घेवाण करण्यासाठी एकत्र येणाऱ्या छोट्या समुहांना प्रोत्साहन द्या. त्यांना आधार द्या. त्यांनी मनमोकळेपणाने सहभागी व्हावे आणि इतरांना आपल्याबरोबर आणावे म्हणून त्यांना मार्गदर्शन करा.

**चौथा प्रस्ताव : ख्रिस्तावर प्रेम करणाऱ्या लोकांचे ऐक्य, त्यांचा जिव्हाळा, प्रेम इतरांना दिसू द्या.**

''तुम्ही ख्रिस्ताचे शरीर असून वैयक्तिकरित्या त्याचे अवयव आहात'' (१ करिंथ. १२:२७).

आपल्या गावात, शहरात ख्रिस्तावर प्रेम करणारे इतरही लोक आहेत पण ख्रिस्तावर प्रेम करण्याची त्यांची पद्धत आपल्यापेक्षा वेगळी असेल. आपण स्वत:ला 'ख्रिस्ती' म्हणतो याचा अर्थ आपण 'ख्रिस्त' धारण करतो. बाप्तिज्म्याद्वारे आपल्याला 'ख्रिस्ती' अशी ओळख प्राप्त होते आणि आपण ख्रिस्तामध्ये एकत्र येतो. पण केवळ नामधारी ख्रिस्ती असण्यापेक्षा खऱ्या ख्रिस्ती मूल्यांसह आपण जगासमोर येणं गरजेचं आहे. ख्रिस्ताचा प्रकाश जगाला देऊ या:

विचारांमध्ये मतभेद असले म्हणजे एकमेकांमध्ये दुरावा निर्माण व्हायला पाहिजे असं नाही. ख्रिस्ताने आपल्या कार्यकालामध्ये भेदभाव केला नाही, त्याने अनेक सीमा ओलांडल्या. क्रुसावर टांगलेला असताना त्याने आपले दोन्ही बाजू सर्वांना कवेत घेण्यासाठी पसरले. ख्रिस्ताला अनुसरणाऱ्या सर्वांनी कोणताही भेदभाव न ठेवता एकत्र यायला पाहिजे. आपण वेगळे राहू शकत नाही. देवाचा प्रकाश जगावर पसरला पाहिजे. पवित्र आत्मा सर्वांना एकत्र आणतो.

**सर्वांसाठी सूचना** : इतर माणसांकडे जा. वेगळे विचार असलेल्या लोकांबरोबर संवाद साधा. इतर संघटना, समूह, स्थलांतरीत यांच्याबरोबर संवाद साधा. इतरांना आपल्याकडे बोलवा, त्यांचे स्वागत करा. फार मोठ्या अपेक्षा न ठेवता अगदी साध्या प्रार्थनेद्वारे सर्वजण ख्रिस्तामध्ये एका छत्राखाली येऊ शकतात. याचप्रकारे आपण भविष्यात संपूर्ण ऐक्याची आशा धरू शकतो.

**स्थानिक पाळकीय नेत्यांसाठी सूचना** : पाळकीय कार्य करताना अन्य ख्रिस्ती पंथियांना बरोबर घेऊन कार्य करा. त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणतीही गोष्ट करू नका.